प्रकरण पाचवे :

# दलित मुक्तीची राजकीय व्यूहनीती - टीकात्मक अभ्यास

## प्रकरण पाचवे

## दलित मुक्तीची राजकीय व्यूहनीती - टीकात्मक अभ्यास

'दलित मुक्तीच्या राजकारणाचा विचार करताना 'आपणास असे दिसून येते की, दलितांना त्यांचे मानवी मूलभूत अधिकार मिळवून देण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्वतःची अशी व्यूहनीती विकसित केली होती. स्वातंत्र्यपूर्व काळात आणि स्वातंत्र्योत्तर काळात बाबासाहेबांनी दलित मुक्तीसाठी जे डावपेच आखले ते अत्यंत महत्त्वाचे होते.' हजारो वर्षांपासून भारतीय समाज व्यवस्थेत दलितांना आर्थिक, सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व सांस्कृतिक गुलामगिरीत खितपत ठेवले. या गुलामगिरीतून अस्पृश्य वर्गाची मुक्तता करण्यासाठी व त्यांचे राजकीय अधिकार मिळवून देण्यासाठी बाबासाहेबांनी आपल्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली. [१]

बाबासाहेबांच्या राजकीय विचारामध्ये राजकीय सत्तेची भूमिका महत्त्वाची होती. कारण राजकीय सत्तेशिवाय दलितांची सामाजिक, राजकीय व आर्थिक स्थिती बदलणार नाही असे त्यांचे मत होते. म्हणून स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्यानंतरही बाबासाहेबांनी दलितांना शासकीय नोक-यात राखीव जागा, कायदेमंडळात राखीव जागा, भूमिहिनांना जमिनीचे वाटप इत्यादी प्रश्नावर चळवळ उभी केली. बाबासाहेबांच्या या चळवळीला ब-याच प्रमाणात यशही आले. परंतू स्वातंत्र्यानंतर आजच्या परिस्थितीचा विचार केल्यास आपणास असे दिसते की, आजही दलितांचे प्रश्न अत्यंत जटील व गुंतागुंतीचे आहेत. शासकीय नोक-यातील राखीव जागा घटनात्मक मार्गाने देण्यात आल्या. पण राखीव जागांचा अनुशेष भरण्याची अंमलबजावणी व्यवस्थितरित्या होत नाही. आजही भूमिहीन दलितांना शेतजमिनीचे वाटप झालेले नाही. कायदे मंडळातील राखीव जागा भरल्या

जोतात पण सत्ताधारी कॉंग्रेस पक्षाच्या ताटाखाली असणारेच दलित पुढारी राजकीय सत्तेत सहभाग मिळवून आहेत. तसेच सामाजिक दृष्टया पाहिल्यास जातीयवादी पक्ष संघटना छुप्या पध्दतीने राजकारणात व समाजकारणात विषमता जिवंत ठेवू पाहात आहेत. त्यामुळे आजच्या भारतीय व्यवस्थेच्या संदर्भात दलितांचे प्रश्न जास्तच जटील बनत चालले आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातही या आर्थिक, सामाजिक, राजकीय प्रश्नांची तीव्रता होतीच. जुन्या सरंजामशाही शेती व्यवस्थेमध्ये अस्पृश्य दलित समाज, शेतमजूर म्हणून राबत होता. त्यामुळे त्यांचा आर्थिक व सामाजिक विकास पूर्णपणे खुंटला होता. मानवी भौतिक गरजा पूर्ण होण्यासाठी आर्थिक प्रश्न सुटणे गरजेचे असते. हे आर्थिक, सामाजिक प्रश्न राजकीय सत्ता हातात आल्याशिवाय सुटू शकत नाही. परंतू भारतीय समाज व्यवस्थेने दलित वर्गाला राजकीय सत्तास्थानेच बंद केल्याने ते आपला विकास साधू शकले नाहीत.

## दलितांपुढे मुक्तीसाठी असणारे मार्ग

भारतामध्ये इंग्रज सत्तेचा अंमल सुरू झाल्यावर त्यांनी येथील जात आणि धर्म या घटकांवर लक्ष केंद्रित करून भारतातील जातीय व धार्मिक अहंकार फुलविला व आपली सत्तास्थाने जास्तीत जास्त बळकट केली. हा इंग्रजांच्या कूट नीतीचा एक भाग होता आणि त्यात ते ब-याच प्रमाणात यशस्वी झाले आणि आपले साम्राज्य टिकवू शकले. इंग्रजांच्या काळात दलितांचे प्रश्न सातत्याने उभे राहत होते. परंतु भारतातील मोठया वर्गांना त्यांनी हाताशी धरून त्यांना त्यांनी राजकीय व्यवहारात गुंतविले. त्यामुळे ब्रिटीशांच्या काळात राजकारणाचा जात आणि धर्म हा केंद्रबिंदु बनला होता. अशा परिस्थितीत 1916 मध्ये मुस्लीम लीग आणि कॉंग्रेस यांच्यात लखनौ करार झाला. त्यामुळे इंग्रजी राज्यात एका अल्पसंख्यांक गटाला राजकीय अस्तित्व बहाल केले जात होते तर हजारो वर्षांपासून गुलामगिरीत असलेल्या दलितांची परिस्थिती जैसे थे होती. दलितांनी या गुलामगिरीतून बाहेर पडण्यासाठी आपल्या मुक्तीचा मार्ग शोधला. इंग्रजांचा पाठिंबा मिळविण्यासाठी त्यांनी धर्मांतरासारखे मार्ग स्विकारले. इंग्रजांच्या काळात कित्येक अस्पृश्य दलितांनी मुस्लीम व ख्रिश्चन धर्मामध्ये धर्मांतर केले. आजही काही ठिकाणी हा मार्ग स्विकारला जातो.

दलितांनी आपल्या मुक्तीसाठी धर्मांतरासारखे मार्ग स्विकारलेच पण काही दलित तरुण सशस्त्र क्रांतीच्या माध्यमातून समाज परिवर्तन आणि आपली मुक्ती करून घेऊ पाहात आहे. दलित मुक्तीसाठी ते नक्षलवादी सारख्या चळवळीमध्ये सहभागी होऊन प्रस्थापित व्यवस्था बदलू पाहात आहेत. परंतू बाबासाहेबांचा दलित मुक्तीचा लढा हा लोकशाहीच्या मार्गाचा लढा होता म्हणून बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर दलित चळवळ ही लढाऊ चळवळ म्हणून पुढे आली. पण ही लढाऊ चळवळ लोकशाहीच्या मार्गाने आपले मानवी अधिकार, हक्क मिळवत आहे . अन्यायी समाज व्यवस्था बदलासाठी सशस्त्र क्रांती ही महत्त्वाची असली तरी सशस्त्र क्रांतीचे दुष्परिणाम हे संपूर्ण देशाला भोगावे लागतात. बाबासाहेबांची लोकशाहीवर प्रचंड श्रध्दा होती. त्यांचा दलित मुक्तीचा मार्ग दलितांचे संघटन करून लोकमताचा दबाव आणून शासनाकडून न्याय्य हक्क मिळविण्याचा होता.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची राजकीय व्यूहनीती

बाबासाहेबांनी दलित मुक्तीच्या राजकारणामध्ये महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांनी दलितांचा सर्वांगीण विकास करण्यासाठी आपली चळवळ स्वतंत्र ठेवली. कारण स्वातंत्र्यपूर्व काळात कॉंग्रेस व इतर तत्सम पक्ष दलितांच्या अधिकार हक्कांचा विचार करीत नव्हते. दलितांमध्ये सामर्थ्य, आत्मतेज व स्वाभिमान हा त्यांची वेगळी स्वतंत्र चळवळ उभी करूनच जागृत होणार होता म्हणूनच त्यांनी आपली चळवळ स्वतंत्र ठेवली. संघर्षाचा मार्ग बाबासाहेबांनी स्वीकारला. कारण संघर्षाशिवाय जागृती शक्य नाही. हे त्यांचे सूत्र होते. परंतु बाबासाहेबांचा संघर्षाचा मार्ग हा भगवान बुध्द, फुले, कबीर यांच्या विचारसरणीचा मध्यम मार्ग होता. त्यांनी 1923 पासून दलितांच्या संघटित शक्तीचा दबाव निर्माण करून दलितांना जास्तीत जास्त फायदे मिळवून दिले ते स्वतः लोकशाही व संसदीय व्यवस्थेचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे त्यांनी वेळोवेळी वाटाघाटी तसेच दबावाचे राजकारण करून दलितजनास योग्य होतील असे निर्णय तत्कालीन शासनास घेण्यास भाग पाडले.

स्वातंत्र्यपूर्व काळात दलितांमध्ये जाणीव आणि जागृती निर्माण करून दबावाचे राजकारण त्यांनी केले. हे करीत असताना त्यांनी दलितांचे भक्कम संघटन केले. 1936

मध्ये स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली व समाजातील शोषित, पिडीत, दलित, कष्टकरी या सर्वांना या पक्षात प्रवेश दिला. 1937 साली झालेल्या निवडणूकीत मजूर पक्षाला ब-यापैकी यशही मिळाले. पण पुढे बदलत्या राजकीय परिस्थितीत बाबासाहेबांनी मजूर पक्षाचा प्रयोग मागे घेतला. कारण ब्रिटीशांनी बाबासाहेबांना मजूरांचा पुढारी म्हणून मान्यता दिली पण बाबासाहेबांचा मुख्य उद्देश दलितांचे हितसंवर्धन व त्याची मुक्ती करणे हाच होता. ते ख-या अर्थाने भारतातील तमाम पददलितांचे प्रतिनिधी होते. त्यामुळे नव्या परिस्थितीत मजूर पक्षाचे अस्तित्व त्यांना अडचणीचे भासू लागले त्यामुळे देशातील सर्व दलितांची एक देशव्यापी संघटना असावी असा विचार करून त्यांनी शेडयूल्ड कास्ट फेडरेशन या पक्षाची स्थापना केली. परंतू 1946 च्या निवडणूकीत शे.का.फे. चा दारूण पराभव झाला. 1937 च्या मजूर पक्षाच्या तुलनेने हा पक्ष अयशस्वी ठरला. पुढे ब्रिटीशांनी भारतीय स्वातंत्र्याच्या वेळी बाबासाहेबांना कोणतेही स्थान दिले नाही. शे.का.फे. चे राजकारण म्हणावे तेवढे यशस्वी न झाल्याने पुढे घटना समितीवर जातानाही त्यांना बंगालमध्ये मुस्लीम लीगची मदत घ्यावी लागली. बाबासाहेब भारतीय राज्यघटनेच्या मसुदा समितीचे अध्यक्ष झाल्यावर भारतीय घटनेत त्यांनी दलितांना कायदेशीर संरक्षण दिले.

स्वातंत्र्यानंतर कायदेमंत्री झाल्यावर बाबासाहेबांनी स्त्रियांना पुरूषाबरोबर अधिकार असावेत यासाठी संसदेत हिंदू कोड बिल आणले पण ते जसेच्या तसे मंजूर न झाल्याने त्यांनी मंत्रीपदाचा त्याग केला. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी आपल्या राजकीय व्यूहनीतीमध्ये फारसा बदल केला नाही. संघर्ष-तडजोड-संघर्ष हाच त्यांच्या व्यूहनीतीचा मुख्य भाग होता. तसेच संसदीय व्यवस्थेत इतर समविचारी पक्षांना बरोबर घेऊन राजकीय सत्ता मिळवावी असे मतही त्यांनी मांडले. त्यादृष्टीने त्यांनी राममनोहर लोहिया यांचेबरोबर चर्चा केली. समाजातील सर्व जातीधर्माच्या पददलितांना व इतर मागास जातींना बरोबर घेऊन त्यांचे संघटन केले तरच दलितांच्या हाती सत्ता येऊ शकते असा विचारही त्यांनी मांडला होता. आज उत्तर प्रदेशात पददलित व इतर मागासजाती यांचे सरकार येऊ शकते. हा बाबासाहेबांच्या राजकीय दूरदृष्टीचा प्रत्यय आहे.

एवढे मात्र खरे की, स्वतंत्र मजदूर पक्षाच्या बरखास्तीचा बाबासाहेबांचा निर्णय हा घाईचा होता असे म्हणणे भाग पडते. कारण मजूर पक्षाच्या रूपाने त्यांनी कॉंग्रेसला पर्याय निर्माण केला होता. परंतू शे.का.फे.च्या स्थापनेमुळे या प्रक्रियेस खीळ बसली. शे.का.फे.सुध्दा यशस्वी होत नाही. हे बाबासाहेबांच्या लक्षात आल्यावर त्यांनी उशीरा शे.का.फे.बरखास्त करावा असे आपल्या अनुयायांना सुचविले होते. पण 1951-52 सालीच जर त्यांनी शे.का.फे. रद्द करून रिपब्लिकन पक्ष स्थापन केला असता तर जास्त योग्य झाले असते.

## स्वातंत्र्योत्तर काळातील बदलते राजकारण आणि दलित प्रश्न

6 डिसेंबर 1956 रोजी बाबासाहेबांचे महानिर्वाण झाले. आपल्या निवार्णापूर्वी बाबासाहेबांनी दलितांच्या मुक्तीसाठी आपल्या लाखो समाज बांधवांसह नव्या मानवधर्माची बौध्द धम्माची दीक्षा घेतली. बौध्द धर्म हा भारतीय संस्कृतीचाच एक महत्वाचा भाग आहे असे त्यांचे मत होते. परंतू बाबासाहेबांच्या निर्वाणानंतर स्वातंत्र्योत्तर काळात दलितांना कायदेमंडळात प्रतिनिधीत्व मिळाले पण राखीव मतदार संघामुळे सवर्णाच्या ताटाखालची मांजरे मोठया प्रमाणावर निवडून आली. कॉंग्रेसच्या वर्चस्वामुळे हे दलित प्रतिनिधी आपला वेगळा गट निर्माण करू शकले नाहीत. त्यामुळे दलितांनी आपली संघटित शक्ती वाढवूनही दलितांच्या पक्षाला कायदेमंडळात योग्य पक्षबळ मिळाले नाही. नोक-यामधील राखीव जागांची योग्य अंमलबजावणी होत नाही, जमिनीचे वाटप भूमिहिनांना झाले नाही. त्यामुळे त्यांचे आर्थिक, सामाजिक व राजकीय प्रश्न अत्यंत जटिल बनले.

स्वातंत्र्योत्तर काळात बदलत्या राजकीय परिस्थितीत रिपब्लिकन पक्ष स्थापन केला गेला. परंतु तो फूटीच्या राजकारणातच अडकल्यामुळे दलितांची संघटित शक्ती कमी झाली. त्यामुळे बहुसंख्य दलित वर्ग हा कॉंग्रेसच्या पाठीशी उभा राहिला. कॉंग्रेस पक्षानेही या वर्गाचा मताच्या राजकारणासाठीच वापर करून घेतला. बाबासाहेबांना अपेक्षित असलेले सत्तेचे न्याय्य वाटप, शासकीय नोक-यात मोक्याच्या जागा, जातीय व धार्मिक समता यासारखे प्रश्न आजही दलितापुढे उभे राहत आहेत.

## रिपब्लिकन पक्षाची व्यूहनीती

डॉ·बाबासाहेबांच्या महानिर्वाणानंतर 1957 साली त्यांच्या अनुयायांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना केली· परंतु एक दोन वर्षातच या पक्षामध्ये फूट पडली· दलितांना त्यांचे मानवी मूलभूत अधिकार आणि त्यांच्यात जागृती निर्माण करण्याचे काही प्रमाणात कार्य या पक्षाने केले· परंतू दादासाहेब गायकवाड यांच्यासारख्या नेत्याने 1958 पासून 1964-65 पर्यंत भूमिहिनांचा जो सत्याग्रह केला· त्याला डाव्या चळवळीच्या इतिहासात तोड नाही· नवबौध्दांना सवलती, जमीनीचे वाटप, दलित अन्याय अत्याचाराला विरोध याविषयी रिपब्लिकन पक्षाने जे सामाजिक आणि राजकीय लढे उभे केले त्यामुळे दलित समाजामध्ये जागृती बरोबरच सर्वांगीण विकासाची भावना विकसित झाली·

आपल्या संघटनेच्या जोरावर आपण सत्तेमध्ये वाटा मिळवावा असे बाबासाहेबांनी सांगितले होते· रिपब्लिकन पक्षाने राजकीय जागृतीसाठी व संघठनासाठी संसदीय व्यवस्थेचा स्वीकार केला आणि सर्व शोषितांना एकत्र आणण्याचा प्रयत्न केला· या देशातील सर्व शोषितांची आघाडी बनवून राजकीय सत्ता हातात यावी ही भूमिका त्यामागे होती· परंतू पक्षातील अंतर्गत फूटीमुळे या पक्षात बौध्देत्तर समाज मोठया प्रमाणावर येऊ शकला नाही· नेत्यांची नेतेपणासाठी भांडणे जुंपली· रिपब्लिकन पक्षाने बाबासाहेबांच्या व्यूहनीतीप्रमाणे राजकारण न केल्याने या पक्षाविषयी दलित जनताच नाराज झाली· निवडणूकीच्या राजकारणात पक्षाच्या या दुहीमुळे दलितांची मते विभागली गेली आणि या सर्व राजकारणाचा फायदा कॉंग्रेस पक्षाने घेतला· त्यामुळे 1970 नंतर दलित जनता मोठया प्रमाणात अन्याय-अत्याचाराला बळी पडू लागली· डॉ·बाबासाहेबांच्या नंतर लोकनेते म्हणता येतील असे एकच व्यक्तिमत्व रिपब्लिकन पक्षाजवळ होते ते म्हणजे दादासाहेब गायकवाड हे होय· त्यांनी बौध्दांच्या हितसंबंधांच्या संवर्धनापुरती चळवळ न ठेवता सामान्य कष्टकरी दलितांच्या आर्थिक उन्नतीचा जो लढा दिला तो नाकारता येत नाही· पण त्यांनी कॉंग्रेसशी आघाडी केल्यामुळे रिपब्लिकन पक्षाचे फार नुकसान झाले·

नेत्यांची दुही, सत्ता लालसा यामुळे रिपब्लिकन पक्षात जी फूट पडली· त्यामुळे दलितांची शक्ती कमी झाली· 1970 नंतर दलितांवर विशेषतः खेडयातील दलितांवर

मोठया प्रमाणात अन्याय झाले. 1972 नंतर देशाच्या अर्थव्यवस्थेचे चटकेही दलित समाजात तीव्रपणे भोगावे लागले. ग्रामीण व शहरी दलितांचे प्रश्न गंभीर बनले. रिपब्लिकन पक्षाच्या प्रस्थापित पुढा-यांनी दलितांच्या या प्रश्नांकडे पूर्णपणे डोळेझाक केली.

बाबासाहेबांच्या नंतर रिपब्लिकन पक्ष चळवळीच्या मार्गाने जाणे गरजेचे होते., त्या मार्गाने न गेल्याने दलित समाजाचे फार मोठे नुकसान झाले.

दलित पँथरची व्यूहनीती

1957 साली स्थापन झालेला रिपब्लिकन पक्ष नेत्यांच्या संधीसाधू वृत्तीमुळे व आपसातील अहंकारामुळे एक स्वतंत्र व खंबीर विरोधी पक्ष म्हणून उभा राहू शकला नाही. सर्व दलितांचे संघटन न करता हा पक्ष फक्त एक जातीयच राहिला. नेत्यांच्या सत्ता लालसामुळे व आपसातील फूटीमुळे निवडणूकीच्या राजकारणात, संसदीय व्यवस्थेवर म्हणावा तेवढा प्रभाव रिपब्लिकन पक्ष पाडू शकला नाही. आर्थिक आणि जातीय कारणांमुळे दलितांवर मोठया प्रमाणात सवर्णांकडून अन्याय अत्याचार होऊ लागले. या अत्याचाराला वाचा फोडण्यासाठी रिपब्लिकन पक्ष अयशस्वी ठरला. 1972 च्या भारताच्या एकूण आर्थिक परिस्थितीमुळे दलितांचे प्रश्न अत्यंत गुंतागुंतीचे बनले. दलितांना भेडसावणारे आर्थिक, सामाजिक आणि जातीय प्रश्नांवर प्रखरपणे लढा देणारी संघटना असणे ही गरज वाटत होती. रिपब्लिकन पक्षाचा नाकर्तेपणा व दलित अत्याचारास "टोल्यास टोला" अशी संघर्षाची भूमिका घेऊन 1972 मध्ये नामदेव ढसाळ व राजा ढाले यांनी दलित पँथरची निर्मिती केली. डॉ.बाबासाहेबांच्या निवार्णानंतर रिपब्लिकन पक्षाने जेवढया मोठया प्रमाणात दलित मुक्तीचा विचार केला नाही तेवढया मोठया प्रमाणात पँथरने दलित मुक्तीचा विचार केला. अनुसूचित जाती-जमाती, नवबोध्द, कष्टकरी जनता, कामगार, भूमिहीन शेतमजूर, गरीब शेतकरी, भटक्या जमाती, आदिवासी या सर्वांची दलितात गणना करून पँथरने व्यापक चळवळ उभी केली.

पँथरने "सम्यक क्रांती"चा मंत्र देऊन "विषमते विरूध्द महायुध्द" पुकारण्याचा नारा दिला. त्यामुळे 1972 नंतर महाराष्ट्रात व देशात दलित तरूणांमध्ये जागृती निर्माण झाली. पँथरने नेहमीच आपली चळवळ आक्रमक ठेवली. मनुस्मृतीचे दहन, हिंदू

देवतांवर टीका, शंकराचार्यांना जोडे दाखविणे, या सारखे आक्रमक लढे पुकारलेच पण त्याचबरोबर दलित विद्यार्थी शिष्यवृत्ती, भूमिहिनांना जमिनींची मागणी यासारख्या आर्थिक प्रश्नांवर लढे उभे केले·

दलित मुक्तीच्या राजकारणात पँथरने जाती व्यवस्थेच्या बरोबर वर्ग आणि वर्ण व्यवस्थेचा नाशही महत्त्वाचा मानला व जनआंदोलने उभी केली· निवडणूकीच्या राजकारणात पँथरचा प्रभाव जाणवतो· 1974 मध्ये मध्य मुंबईतील लोकसभेच्या पोटनिवडणूकीवेळी पँथरने जो बहिष्कार पुकारला त्यामुळे कॉंग्रेसचा पराभव झाला व डाव्या विचारसरणीच्या रोझा देशपांडे निवडून आल्या·

1974 मध्ये पँथरचा जाहीरनामा नामदेव ढसाळांनी प्रसिध्द केला· हा जाहीरनामा कम्युनिस्ट विचारांचा आहे, असा आरोप श्री·राजा ढाले यांनी केला व विरोध केला· पँथरमध्ये "बुध्द कि मार्क्स" असा वैचारिकवाद सुरू झाला· या वैचारिक संघर्षाबरोबरच आरोप-प्रत्यारोप, व्यक्तिवाद, नेतृत्वाचा हव्यास यामुळे पँथरमध्ये फूट पडली· परंतु महाराष्ट्रात एक आक्रमक व लढाऊ आंबेडकरवादी पँथर राजा ढाले यांनी कोणताही विचार न करता तडकाफडकी बरखास्त करून टाकली· यामुळे दलित चळवळीचे फार मोठे नुकसान झाले असे म्हणावे लागेल·

पँथरच्या बरखास्तीनंतर पँथरची चळवळ थांबली नाही· 1976 मध्ये प्रा·अरूण कांबळे, रामदास आठवले, गंगाधर गाडे, दयानंद मस्के, भाई संगारे आदि मंडळींनी दलित पँथरचे भारतीय दलित पँथर असे नामकरण करून पँथरचे पुनरूज्जीवन केले व पँथरला एक वैचारिक बैठक व शिस्त देण्याचा प्रयत्न केला· संसदीय राजकारणात सहभागी होऊन व संसदीय व्यवस्थेच्या बाहेर राहून लोकशाहीच्या मार्गाने भारतीय दलित पँथरने सर्व दलितांना एकत्र केले· स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकारणातच पँथर काही प्रमाणात यशस्वी झाली· महाराष्ट्रात दबावगट म्हणून पँथरने शासनावर नेहमीच प्रभाव पाडला· नामांतर, मंडल आयोग, रिडल्स प्रकरण यावर पँथरने आवाज उठविला·

परंतु एवढे मात्र निश्चित की, 1978 पासून मराठवाडा विद्यापीठाचे नामांतर या एकाच भावनिक प्रश्नाभोवती भारतीय दलित पँथरची चळवळ उभी राहिली· पण भावनिक प्रश्नांवर फार काळ लोकांचे संघटन राहू शकत नसते· हे पँथरच्या नेत्यांनी जाणले नाही· त्यामुळे बौध्देत्तर काही जाती-जमातीचा पाठिंबा पँथरला मिळाला· मातंग, चर्मकार, ढोर, भटके-विमुक्त या दलित जाती पँथरच्या झेंडयाखाली कधी येऊ शकल्या नाहीत, हे पँथरचे दुर्दैवच म्हणावे लागेल· बौध्दां व्यतिरिक्त इतर दलित जातीची मानसिकता बदलण्यास ही चळवळ अयशस्वी ठरली·

1980 नंतर देशात हिंदुत्ववादी पक्ष संघटना धर्माच्या नावाने राजकीय सत्ता काबीज करू पाहात आहेत· या शक्तींना कॉंग्रेस व इतर समविचारी पक्षांच्या सहाय्याने रोखण्याचा प्रयत्न पँथरने केला हे नाकारता येत नाही·

रिपब्लिकन पक्षाच्या भूमिकेपेक्षा दलित पँथरची भूमिका जास्त व्यापक आणि लढाऊ होती· रिपब्लिकन पक्षाचा भर संसदीय राजकारणावर होता· त्यामुळे त्याने कॉंग्रेस सारख्या पक्षाशी आघाडी करून आत्मघात करून घेतला· दलित पँथरने संसदीय राजकारणापेक्षा संसदबाह्य राजकारणावर भर दिला· परंतू एक चळवळ म्हणून जरी 1974 नंतर पँथर्सने महाराष्ट्रातल्या राजकारणावर प्रभाव टाकला तरी दलितांची राजकीय शक्ती ते संघटित करू शकले नाहीत· राजकीय पक्ष, संघटना स्थापन करून आपल्याला अभिप्रेत असणारी तत्वे ते अंमलात आणण्याच्या बाबतीत दलित पँथर चळवळ बरीच अयशस्वी ठरली·

<u>भारतीय रिपब्लिकन पक्ष-बहुजन महासंघ यांची व्यूहनीती</u>

1980 नंतर डॉ·बाबासाहेब आंबेडकरांचे नातू ॲड·प्रकाश आंबेडकर यांनी भारतीय राजकारणात पदार्पण केले· 1984 साली भारतीय रिपब्लिकन पक्षाची पुनर्बांधणी करून त्यांनी बाबासाहेबांना अभिप्रेत असलेला पक्ष उभा केला आहे· प्रकाश आंबेडकरांनी व्यापक भूमिका घेऊन एकजातीय राजकारण न करता तमाम पद्‌दलितांचे संघटन करण्याचा प्रयत्न सुरु केला· दलितांची चळवळ भावनिक प्रश्नांभोवती फिरवत न ठेवता त्यांच्या आर्थिक विकासाचा त्यांनी विचार केला·

1984 पासून साखर कारखान्यांचे राष्ट्रीयीकरण, जमिनीचे राष्ट्रीयीकरण, मंडल आयोगाची अंमलबजावणी, नामांतर व रिडल्स प्रकरण या प्रश्नांवर त्यांनी दिलेले लढे दलित मुक्तीच्या राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाचे आहेत. त्यांच्या पक्षात दलित पँथरसारखी बेशिस्त व 1957 च्या रिपब्लिकन पक्षासारखी दुफळी नाही. कष्टकरी, दलित, शेतमजूर, कर्मचारी, कामगार या क्षेत्रात त्यांनी आपले स्थान बळकट केले आहे.

1984 पासून निवडणूकीच्या राजकारणात ते ब-यापैकी आपला प्रभाव पाडत आहेत. उत्तरेकडे बहुजन समाज पार्टी श्री. कांशीराम यांच्या नेतृत्वाखाली प्रभावी बनत असताना श्री. प्रकाश आंबेडकरांनी त्याच धर्तीवर महाराष्ट्रात 1990 नंतर बहुजन महासंघाची स्थापना करून काँग्रेस, भाजपा व शिवसेना यासारख्या पक्षांच्या हुकुमशाही प्रवृत्तीला आळा घालण्याचा प्रयत्न आहे. भारिप-बहुजन महासंघाच्या रूपाने त्यांनी नवी राजकीय व्यूहनीती अलिकडच्या काळात यशस्वी केली आहे. दलितासह इतर मागास जाती-जमातींचा पाठिंबा मिळवून सत्ता हस्तगत करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. उत्तर प्रदेशात कांशीराम यांनी बहुजनांच्या पाठिंब्यावर जशी सत्ता मिळविली. त्याच मार्गाने जाण्याचा त्याचा प्रयत्न दिसतो. 1992 मध्ये "अकोला पॅटर्न" च्या रूपाने त्यांनी बहुजन समाजाच्या हातात सत्ता येऊ शकते, हे दाखवून दिले आहे. तसेच 1993 च्या नांदेड जिल्हयातील किनवट मतदार संघात भीमराव केराम यांना निवडून आणून त्यांनी काँग्रेस पक्षाला धक्का दिला आहे. परंतु भविष्यकाळात त्यांच्या नेतृत्वाला बहुजन समाजाने पाठिंबा दिला तरच त्याचे हे राजकारण यशस्वी होऊ शकते.

दरम्यानच्या काळात भारतीय राजकारणामध्ये श्री. कांशीराम यांच्या बहुजन समाज पार्टीने चळवळ जोरात सुरु केली आहे. त्यांनी उत्तरेमध्ये दलितांना लढावू बनविण्याचा प्रयत्न सुरु केला आहे. त्यांनी ही हिंदू समाजातील व्दिज जाती वगळून बहुजनांना संघटित करण्याचा प्रयत्न केला आहे. 1993 च्या उत्तर प्रदेश विधानसभा निवडणूकीत ब.स.पा. आणि स.पा. या दोन दलित व मागासवर्गीयांचा पक्षाला विजय मिळाल्याने ते सत्तेवर आले त्यामुळे श्री. कांशीराम यांचे राजकारण सर्व देशभर पसरू पाहात आहे. त्याच्या भूमिकेची बहुजन महासंघाच्या भूमिकेशी चर्चा करणे गरजेचे आहे.

## बहुजन समाज पार्टी व बहुजन महासंघ

समाजातील दलित, अल्पसंख्यांक, इतर मागासवर्गीय या सर्व जाती-जमातींना एकत्र करून या बहुजन समाजाच्या संघटित शक्तीच्या जोरावर राजकीय सत्ता मिळविण्याचा प्रयत्न श्री·कांशीराम यांची बहुजन समाज पार्टी करीत आहे· याच धर्तीवर महाराष्ट्रात प्रकाश आंबेडकरांच्या नेतृत्वाखाली बहुजन महासंघ हा बहुजनांचे राजकारण करीत आहे· परंतु या दोन राजकीय पक्षाच्या भूमिकेमध्ये आपणास फरक जाणवतो· ब·स·पा·ची राजकीय चळवळ ही अत्यंत आक्रमक व जातीय राजकारणात खतपाणी घालणारी दिसते· तर बहुजन महासंघ हा जात आणि वर्ग या पयावर संघटन करीत आहे· ब·स·पा·कडे सध्या तरी कोणताही कृतिकार्यक्रम नाही· परंतू बहुजन महासंघाकडे सर्व बहुजनांना संघटित करून त्यांची सर्वांगिण उन्नती कशी करता येईल, याचा कृति कार्यक्रम आहे· ब·स·पा·ची राजकीय भूमिका ही दलितांनी स्वतंत्र आंबेडकरवादी चळवळ चालावी अशी आहे तर बहुजन महासंघाची राजकीय भूमिका ही दलितांनी पुढाकार घेऊन बहुजनांना संघटित करावे असा प्रयत्न आहे· ब·स·पा· पूर्णपणे आंबेडकरवादी आहोत असे मानतो परंतू बहुजन महासंघ आंबेडकरी विचारपरंपरे बरोबर वैदिक ब्राह्मणी संस्कृती वगळून सर्व बहुजन समाजाची परंपरा मानतात· ब·स·पा·85 टक्के बहुजनांचे राजकारणजरी करू इच्छित असले तरी त्यांचे राजकारणाला व्यवस्थित अशी वैचारिक बैठक नाही असे दिसते·

## टीकात्मक विवेचन

डॉ·बाबासाहेब आंबेडकरांनी दलितांची चळवळ स्वतंत्र ठेवून दलित मुक्तीच्या राजकारणात दलितामध्ये जागृती निर्माण केली· दलितांनी त्यांना स्वतःचे मानवी अधिकार मिळविण्यासाठी प्रस्थापित व्यवस्थेच्या विरूध्द संघर्ष करायला शिकविले· स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या तत्वावर समाज निर्माण व्हावा यासाठी बाबासाहेबांनी संघर्षासाठी सत्याग्रहाचे साधन वापरले आणि दलितांमध्ये आत्मतेज जागे केले· परंतु बाबासाहेबांनंतरच्या सर्व दलित संघटनांनी बाबासाहेबांच्या मार्गाने जायला पाहिजे होत्या· बदलत्या राजकीय, सामाजिक, आर्थिक व्यवस्थेच्या संदर्भात आंबेडकरी विचारांची, लोकशाहीच्या मार्गाची लढाई करायला हवी होती·

परंतु या सर्व संघटना व पुढा-यांनी दलितांच्या व्यापक हिताचा विचार न करता आंबेडकरी चळवळच स्वयंकेंद्रित करून टाकली· आजही ग्रामीण भागातील दलित शेतमजूर विस्कळीत आहे· दलित तरुण दिशाहीन आहे· त्यांना एका वैचारिक भूमिकेतून संघटित करण्याचे काम या चळवळीने करायला पाहिजे· बाबासाहेबांनंतरचा रिपब्लिकन पक्ष फूटीच्या प्रक्रियेतच गुंतला गेला· त्यामुळे पुढील काळात आंबेडकरी चळवळीत फूटीचा शापच मिळाल्यासारखे झाले· 1972 नंतर दलित पँथरने दलित तरुणांना संघटित करण्याचा प्रयत्न केला· परंतू संघटनात्मक एकीचा अभाव, नेत्यांचे आपसातील हेवेदावे यामुळे ही चळवळ फार काळ टिकली नाही· भारतीय दलित पँथरच्या रूपाने सर्व शोषित पिडीतांचे संघटन करून लढा देण्याचा प्रयत्न काही प्रमाणात झाला· परंतू दलित पँथरने कोणताचा महत्त्वाचा असा कृति कार्यक्रम आखला नाही· नामांतरासारख्या एकाच भावनिक प्रश्नावर ही संघटना जिवंत राहिली· 1984 नंतर डॉ·बाबासाहेब आंबेडकरांचे वंशज प्रकाश आंबेडकर राजकारणात आले· त्यांनी व्यापक दृष्टिकोनातून चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न सुरू केला आहे· दलितांसह सर्व इतर मागासांना बरोबर घेऊन बहुजन समाजाची राज्यसत्ता प्रस्थापित करण्याचा त्यांचा मानस आहे· परंतू दलित समाज हा रिपब्लिकन पक्षाच्या विविध गटात विभागला गेला आहे· त्यामुळे संपूर्ण दलित समाज प्रकाश आंबेडकरांबरोबर येईलच असे म्हणता येत नाही आणि बहुजन समाजही त्यांचे नेतृत्व स्विकारील यांची शाश्वती देता येत नाही· त्यामुळे दलित चळवळीला एक व्यापक पाया देण्याचा प्रयत्न व सर्वसमावेशक प्रश्नांवर लढा उभा करावा लागणार आहे आणि हे काम सुशिक्षित आंबेडकरी अनुयायांचे आहे·